# राज्यात लवकरच रुग्णवाहिका धोरण!

## परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा, रूग्णांना कमी पैशात दर्जेदार सुविधा

प्रतिनिधी २ ऑगस्ट

मुंबई : खासगी रुग्णवाहिका सेवांकडून मनमानी पद्धतीने आकारल्या जाणाऱ्या दरांवर लवकरच नियंत्रण येणार आहे. रुग्णवाहिका सेवा अधिक सक्षम, पारदर्शक आणि शिस्तबद्ध करण्यासाठी राज्य सरकार महाराष्ट्र राज्य रुग्णवाहिका धोरण आखणार आहे, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी शनिवारी दिली. मोटर वाहन विभागांतर्गत हे धोरण आखले जाणार आहे.

राज्यात सध्या एमईएमएस १०८ भागीदारी प्रकल्पांतर्गत सुमारे १,०७६ रुग्णवाहिका कार्यरत आहेत. याशिवाय खासगी रुग्णालये, धर्मादाय संस्था आणि स्वयंसेवी संस्थांच्या मिळून सुमारे ४,५०० ते ५,००० रुग्णवाहिका सेवा देत आहेत.

मात्र, कोणती रुग्णवाहिका कुठे आहे, ती उपलब्ध आहे का, रुग्णापर्यंत किती वेळात पोहोचेल, कोणत्या सुविधांनी सुसज्ज आहे आणि दर किती आकारले जातील, याची एकसंध व विश्वासार्ह माहिती नागरिकांना उपलब्ध होत नाही. ही उणीव नव्या धोरणातून दूर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. प्रस्तावित व्यवस्थेत नागरिक, रुग्णवाहिका चालक, रुग्णवाहिकेतील टॅब तसेच, आरटीओ आणि आरोग्य विभागासाठी स्वतंत्र डिजिटल प्रणाली विकसित करण्याचा विचार आहे. या प्रणाली एकमेकांशी जोडल्या जाणार असून, नागरिकांना जवळची उपलब्ध रुग्णवाहिका शोधणे, तिचे अचूक स्थान पाहणे, अंदाजित पोहोचण्याची वेळ आणि भाडे जाणून घेणे शक्य होणार आहे. आपत्कालीन परिस्थितीत व्हिडिओ कॉलद्वारे प्राथमिक वैद्यकीय मार्गदर्शन मिळण्याची सुविधाही प्रस्तावित आहे.

रुग्णवाहिकेतील टॅबलेटवर रुग्णाची प्राथमिक माहिती, महत्त्वाची लक्षणे, उपचारांची नोंद, रुग्णालयाशी व्हिडीओ संपर्क आणि ऑक्सिजन-सक्शनसारख्या उपकरणांची तपासणी नोंदवता येईल. आरटीओ आणि आरोग्य विभागाच्या डॅशबोर्डवर प्रत्येक नोंदणीकृत रुग्णवाहिकेचे स्थान, स्थिती, प्रतिसाद वेळ, चालकनिहाय कामगिरी, वारंवार कॉल नाकारणाऱ्या चालकांची माहिती तसेच गैरवापराच्या संशयास्पद घटनांची नोंद उपलब्ध होणार आहे. त्यामुळे धोरणातील नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणे शक्य होईल.



### ॲपवर दरपत्र प्रसिद्ध करणे बंधनकारक

» विद्यमान खासगी रुग्णवाहिकांचे दर अनेकदा स्पष्टपणे जाहीर नसल्याने आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांच्या नातेवाइकांना आर्थिक फटका बसतो. नव्या धोरणात नोंदणीकृत प्रत्येक रुग्णवाहिकेने ॲपवर दरपत्रक प्रसिद्ध करणे बंधनकारक करण्याचा विचार आहे.

# खोटे रुग्ण आणि बनावट कागदपत्रे दाखवून 3 रुग्णालयांनी लाटले सरकारचे दोन कोटी रुपये

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**मुंबई:** सार्वजनिक आरोग्य विभागाच्या उपसचिवांनी दिलेल्या तक्रारीवरून शिव मल्टिस्पेशालिटी व क्रिटिकल केअर रुग्णालय, नाशिक ग्रेस रुग्णालय आणि ऋषिकेश रुग्णालय यांच्या पाच पदाधिकाऱ्यांवर सरकारची फसवणूक केल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. आयुष्मान भारत, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना तसेच इतर आरोग्य योजनांतर्गत उपचारांची बिले मंजूर करण्याची प्रक्रिया वरळी येथील जीवनदायी भवनातून राबवली जाते. जीवनदायी पोर्टलवर सादर झालेल्या दाव्यांची तपासणी करण्याचे आदेश सरकारने दिले होते. त्यानुसार नाशिकमधील ३६१ दावे संशयास्पद आढळले. आरोग्य विभागाच्या तपासणीत प्रत्यक्ष उपचार न देता रुग्णांवर उपचार केल्याचे दाखविणारी खोटी प्रकरणे पोर्टलवर सादर केल्याचे उघड झाले. लाभार्थ्यांच्या कागदपत्रांचा गैरवापर करून खोटी माहिती आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे बिले मंजूर करून घेतल्याचा आरोप आहे. तपासणीत शिव मल्टिस्पेशालिटी व क्रिटिकल केअर रुग्णालयाने १६३ प्रकरणांत ७१ लाख ८३ हजार रुपये, नाशिक ग्रेस रुग्णालयाने १२६ प्रकरणांत ६२ लाख १४ हजार रुपये, तर ऋषिकेश रुग्णालयाने ७२ प्रकरणांत ४५ लाख ४६ हजार रुपयांची बिले मंजूर करून घेतल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. नाशिकमधील देवळा, कळवण आणि दिंडोरी तालुक्यांतील दाव्यांची पडताळणी केली असता काही लाभार्थ्यांनी संबंधित रुग्णालयांऐवजी अन्यत्र उपचार घेतल्याचे आढळले. तसंच काही लाभार्थ्यांनी उपचारच घेतले नसल्याचे, तर काहींचा उपचार दाखविलेल्या तारखेपूर्वीच मृत्यू झाल्याचेही तपासणीत स्पष्ट झाले आहे.



# सराईत आरोपी कडून मोटर वाहन चोरीचे 2 गुन्हे उघड

प्रतिनिधी २ ऑगस्ट




मुंबई : निर्मलनगर पोलीस ठाणे, मुंबई अंतर्गत सराईत आरोपीला अटक करून दोन गुन्हे उघडकीस आणले. फिर्यादी मोहम्मद इल्यास शेख रिक्षाचालक, रूम नंबर 31 मदनि कॉम्प्लेक्स ए.के. मार्ग बांद्रा पूर्व मुंबई. यांचे वाहन 26/07/2026 रोजी गरीब नगर मज्जित समोर बांद्रा स्टेशन पूर्व बांद्रा येथून चोरी झाले. पोलिसांनी तपास करीत आरोपी मोहम्मद फरहान उर्फ बोबळी सलमान शेख. वय 20 वर्ष, रा.ठी. 128 केक वाली गली रजा मज्जिदच्या पाठीमागे बांद्रा पूर्व याला अटक केली. बजाज कंपनीचा ऑटो रिक्षा क्रमांक MH 02 EF 1328 जप्त केला. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने घटनास्थळी जाऊन सीसीटीव्ही बघितले असता मिळून आले नाही म्हणून संशयित इसमा बाबत गुप्त बातमीदार यांच्या कडून माहिती मिळाली की सदरचा ऑटो रिक्षा चोरी करणारा इसम हा लकी हॉटेल जंक्शन बांद्रा पश्चिम, पटेल नगर, बांद्रा तलाव येथे त्याचा वावर आहे, म्हणून त्याला तपासण्याकरता गुन्हे प्रकटीकरण पथक गेले असता तो बांद्रा तलाव या ठिकाणी मिळून आला. सदर इसमास पोलीस ठाण्यात आणून गुन्ह्याच्या अनुषंगाने अधिकची चौकशी केली असता सदरचा गुन्हा त्यानेच केल्याचे कबूल केले तसेच निर्मल नगर पोलीस ठाणे हद्दीतून शिबू बार च्या पाठी मागिल मैदानातून आणखी एक रिक्षा चोरी केल्याची कबुली दिल्याने त्यास सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे तंतोतंत पालन करून नमूद गुन्ह्यात रीतसर अटक करण्यात आली आहे. तपास अधिकारी व पथकात पोलीस उपनिरीक्षक संतोष कोळगे, पो.ह. खंडारे, वाघमारे, परदेशी, भोगले, कदम, कोळी यांचा समावेश होता. पोलिस निरीक्षक अजय कुलकर्णी, पारटकर (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली कारवाई पार पडली.

# खार पोलिसांनी 26 वर्षांपासून कोर्टाला चकवा देणाऱ्या फरार आरोपीला केली अटक

प्रतिनिधी २ ऑगस्ट

मुंबई : खार पोलिसांनी 26 वर्षांपासून कोर्टाला चकवा देणाऱ्या फरार आरोपीला अटक केली. मराठी लोकमान्य हॉस्पिटल क्वार्टरस सायन येथील सुनील माळी हा फरार होता. सन 2000 मध्ये दाखल झालेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी सुनील अशोक माळी हा अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, 09 वे न्यायालय, बांद्रा (पूर्व), मुंबई येथील न्यायालयात सुरू असलेल्या प्रकरणाच्या सुनावणीसाठी वारंवार गैरहजर राहत होता. त्यामुळे मा. न्यायालयाने त्याच्या नावाने जाहीरनामा काढला होता. तसेच आरोपी हा दीर्घकाळापासून पोलीस व न्यायालयाच्या नजरेआड राहून फरार होता.

खार पोलीस ठाण्याचे विशेष निगराणी व तडीपार पथक फरार आरोपींचा शोध घेत असताना,आरोपी सुनील अशोक माळी यांच्या सायन येथील पत्त्यावर गेलो असता तेथील चाळ तुटलेली होती. पण सध्या ते कुठे राहत आहे याबद्दल काहीही माहिती मिळाली नाही. टेक्निकल यंत्रणाचा वापर करून त्याच्या बद्दल माहिती घेयुन,त्याचे राहते घरी सापळा रचून अत्यंत शिताफीने नेरूळ नवी मुंबई येथून आज दिनांक 01/08/2026 रोजी सकाळी 11:30 वाजताच्या सुमारास तो राहवयस असलेल्या पत्त्यावरून आरोपीस ताब्यात घेण्यात आले.

# राज ठाकरे यांच्या आरोपानंतर सिद्धिविनायक मंदिरात गोंधळ उडाला; 9 जण निलंबीत





प्रतिनिधी २ ऑगस्ट

**मुंबई:** अयोध्येतील राम मंदिरातील गैरवर्तनावरून देशात राजकीय वातावरण तापलेले असताना, मुंबईतील जगप्रसिद्ध श्री सिद्धिविनायक मंदिरातून कोट्यावधीन देंगिची चोरी झाल्याचा धक्कादायक आरोप समोर आला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी या प्रसिद्ध मंदिरातून दानपेटी चोरीच्या कथित प्रकरणी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. राज ठाकरे यांनी एका पत्राच्या आधारे आरोप केला आहे की, सिद्धिविनायक मंदिरातून एकूण १८ कोटी रुपयांची चोरी झाली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लिहिलेल्या पत्रातील हा आरोप आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबईतील प्रभादेवी येथील प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिरातून १८ कोटी रुपयांची चोरी झाल्याचा आरोप केला आहे. त्यांच्या आरोपांनंतर सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टची कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली. यावेळी सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सदा सरवणकर यांनी ही भूमिका बजावली. यावेळी सदा सरवणकर यांनी सिद्धिविनायक मंदिरात काही प्रमाणात अनियमितता असल्याचे मान्य केले. सदा सरवणकर यांनी स्पष्ट केले की, या प्रकरणात मंदिर ट्रस्टच्या अनेक कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच सदा सरवणकर म्हणाले की, मंदिराचा जन्म न होताच ते वाढले.

महायुतीच्या वेळी माझी सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली होती. त्यानंतर मंदिरात काही अनियमितता आढळल्यास, आम्ही वेळोवेळी त्या सुधारण्याचे प्रयत्न केले. या प्रयत्नांवर काम करत असताना माझ्या लक्षात आले की, कर्मचाऱ्यांमध्ये काही कंत्राटी आणि काही कायमस्वरूपी कर्मचारी आहेत. कृपया लक्षात घ्या की, दर्शनासाठी कर्मचाऱ्यांकडून काही पैसे घेतले जात असतील, तर ते ऑनलाइन घेतले जातात, असे असन सरवणकर म्हणाले. काही कर्मचारी रंगेहाथ पकडले गेले आणि त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. त्यांना काही दिवसांसाठी निलंबित केले. आम्ही त्यांच्या विरोधात एक प्रतिज्ञापत्र लिहिले, ज्यात म्हटले होते की आमच्याकडून असे प्रकार पुन्हा होणार नाहीत. यानंतर माझ्या मनात आले की बाहेर काही स्टॉल विक्रेते आणि एजंट होते जे एकमेकांना दर्शन देण्याच्या नावाखाली आर्थिक व्यवहार करत होते. होय, आम्ही हे वर्तन तात्काळ थांबवू. यानंतर, काही ठिकाणी कर्मचारी फसवणुकीने पैसे उकळतात आणि हे लक्षात आल्यानंतर आम्ही पोलीस विभागाला पत्र लिहून कारवाईची विनंती केली. त्यावेलेलाचे ९ कर्मचारी पकडले गेले.

त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. यामुळे जी काही तूट येते, ती मोठ्या प्रमाणात वाढते, असा दावा सरवणकर नेहमी करत असत.

***परिणामी दुहेरी फरक***

वाढ कशी सुरू राहील किंवा लेखापरीक्षणात वाढ कशी दाखवली जाईल, यासाठी आमचे विश्वस्त लक्ष्य निश्चित करत आहेत. यामुळे वाढ होत आहे. दोन वर्षांपूर्वी तुम्ही ४० ते ४५ लाख का जमा केले? मिळालेली रक्कम ९० ते ९८ लाख रुपयांपर्यंत वाढली आहे. त्यामुळे, अताच्य आणि अधिच्य यांच्या उगमात काही फरक आहे का, यावर संशोधन करण्यासाठी एक शोधनिबंध लिहिला आहे. पैसे गोळा करण्यासाठी ते बाहेरच्या स्वयंसेवी संस्थांना (एनजीओ) बोलवत असत. त्यांच्यामार्फत पैसे हस्तांतरित केले जात. आमच्या असे लक्षात आले आहे की, पैसे कमावण्यासाठी कर्मचाऱ्यांना थांबवल्याने आणि त्यांचा छळ केल्याने केवळ नफ्यात वाढच होऊ शकते. त्यामुळे उपाययोजना करण्यात आल्या, असे सर्वणकर यांनी स्पष्ट केले.

# महाराष्ट्रात 19 जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट, 30 ते 40 किमी प्रतितास वेगाने वारे वाहणार

प्रतिनिधी २ ऑगस्ट

मुंबई : महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना पावसाने झोडपलं आहे. यानंतर पावसाने आज काहिशी उसंत घेतली आहे. तरीदेखील काही ठिकाणी पुराचे पाणी अजून ओसरलेलं नाही. या दरम्यान हवामान विभागाकडून राज्यातील 19 जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातलेला बघायला मिळाला. खान्देशात मुसळधार पावसाने दाणादाण उडाली. खान्देशात अनेक नद्यांना पूर आला. जळगाव, धुळे या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवण विस्कळीत झाले. बोरी नदीला पूर आल्याने पुराचे पाणी अमळनेर शहरात शिरले. यामुळे अनेक घरांमध्ये पाणी शिरले. सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर अनेक नागरिकांचे रेस्क्यू करण्यात आले. दुसरीकडे काही ठिकाणी मुसळधार पावसामुळे पूर आल्याने काही गावांचा संपर्क तुटला. पावसाच्या या उद्रेकानंतर शुक्रवारी पाऊस थांबला असला तरी राज्यातील 19 जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, पुढच्या पाच दिवसांत राज्यातील 19 जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. या सर्व जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. पण सुदैवाने कुठेही अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला नाही. यामुळे राज्यातील नागरिकांना दिलासा मिळाला आहे. हवामान विभागाकडून पुणे घाट, कल्हापूर घाट आणि सातारा घाट परिसराला पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. या भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

**2 ऑगस्टला कोणकोणत्या जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता?**

हवामान विभागाकडून रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच पुणे घाट परिसर, कोल्हापूर घाट परिसर आणि सातारा घाट परिसराला पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. अकोला, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, वाशिम या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये वाऱ्याचा वेग हा 30 ते 40 किमी प्रतितास असण्याची शक्यता आहे.

**3 ऑगस्टला कोणकोणत्या जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता?**

येत्या 3 ऑगस्टला रत्नागिरी, सातारा घाट परिसर, अकोला, अमरावती, बुलढाणा, नागपूर या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या काळात वाऱ्याचा वेग 30 ते 40 किमी प्रतितास असण्याची शक्यता आहे.

**4 आणि 5 ऑगस्टला कोणकोणत्या जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता?**

हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, 4 आणि 5 ऑगस्टला राज्यात केवळ विदर्भातील जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे.

हवामान विभागाकडून भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा या जिल्ह्यांमध्ये या दोन दिवसांसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर यवतमाळ जिल्ह्यासाठी 4 ऑगस्टला पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# गणेशोत्सवात नव्या गाडीचा श्रीगणेशा !

## कोकणवासीयांसाठी आनंदाची बातमी

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**मुंबई** : दीड महिन्यावर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवात कोकणवासीयांसाठी दिलासादायी बातमी समोर आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) ते सावंतवाडी रोडदरम्यान नवीन गाडी चालवण्यास रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. ही गाडी कायमस्वरूपी आणि रोज धावणार असून, रेल्वे प्रशासनाकडून लवकरच तिचे वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे. नव्या गाडीला सीएसएमटी-सावंतवाडी रोड मार्गासाठी १५०८७ आणि सावंतवाडी रोड-सीएसएमटी या परतीच्या प्रवासासाठी १५०८८ क्रमांक देण्यात आला आहे. ही गाडी सीएसएमटी-सावंतवाडी रोड ही नवीन गाडी दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, अडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ आणि सावंतवाडी येथे थांबणार आहे. शेवटचा थांबा असलेल्या रेल्वेगाडीमुळे कोकणवासीयांना कन्फर्म तिकिट मिळत नव्हते. यामुळे मडगावऐवजी सावंतवाडी रोड हा शेवटचा थांबा असलेली गाडी सुरू करण्याची मागणी मुंबई आणि कोकणातील प्रवासी संघटनांकडून सातत्याने होत होती. दादर-सावंतवाडी एक्स्प्रेस रद्द करून त्याजागी उत्तर भारतात धावणारी नियमित गाडी सुरू केल्यानंतर प्रवासी संघटनांमध्ये नाराजी व्यक्त केली होती. अखेर सीएसएमटी-सावंतवाडी एक्स्प्रेस सुरू करण्यात आली.



**नेत्रावती एक्स्प्रेस ठाण्यापर्यंतच**

मुंबई लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पायाभूत सुविधांच्या कामांसाठी मध्य रेल्वेने ४ ते १४ ऑगस्टदरम्यान ११ दिवसांचा विशेष ट्रॅफिक ब्लॉक घोषित केला आहे. यामुळे तिरुअनंतपुरम-एलटीटी आणि राणी कमलापती-एलटीटी या गाड्यांचा प्रवास ठाणे स्थानकात संपवण्यात येणार आहे. गाडी क्रमांक १६३४६ तिरुअनंतपुरम-एलटीटी नेत्रावती एक्स्प्रेस ३ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट आणि १२१५४ राणी कमलापती-एलटीटी एक्स्प्रेस ७ ऑगस्टला ठाणे स्थानकापर्यंतच धावणार आहेत.

# तुमचा कॅप्शन गेम खूपच कमजोर! CJP आंदोलनातील मराठमोळ्या तरुणीचा स्वॅग

प्रतिनिधी २ ऑगस्ट

मुंबई : भाजपनं मराठमोळ्या तरुणीचा एक व्हिडीओ शेअर केला. बाबर की विरासत असा उल्लेख भाजपच्या पोस्टवर होता. त्यावरुन मराठमोळ्या तरुणीनं भाजपला प्रत्युत्तर दिलं आहे. पीपीटीच्या माध्यमातून तिनं अतिशय अनोख्या पद्धतीनं भाजपला प्रत्युत्तर दिलं आहे.

मुंबईतील कंटेट क्रीएटर आणि डान्सर उर्वशी पलांडूरकर सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहे. नीट पेपर फुटीच्या विरोधात विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरू असताना उर्वशीदेखील रस्त्यावर उतरली होती. त्यावेळी तिनं एक रील शूट केलं. उर्वशीचं रील व्हायरल झालं. हेच रील छत्तीसगड भाजपनं त्यांच्या इन्स्टा हँडलवरून शेअर केलं. भाजपनं उर्वशीचं रील थेट बाबरच्या वारशाशी जोडलं. त्यानंतर उर्वशीनं एका पॉवरपॉईंट प्रेंझेटेशनच्या माध्यमातून भाजपला जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. तिच्या या उत्तराचं कॉकरोच जनता पार्टीनं कौतुक केलं आहे.

मुंबईत नीट पेपर फुटी प्रकरणाच्या निषेधार्थ झालेल्या विद्यार्थी आंदोलनात ऊर्वशी सहभागी झाली होती. शांततेत पार पडलेल्या या आंदोलनात ऊर्वशीनं एक रील चित्रित केलं होतं. तो व्हिडीओ शेअर करत भाजपनं 'बाबरच्या वारशावर नाचणारे जेन झी,' असा उल्लेख केला. राष्ट्रपतींच्या हस्ते शौर्य पुरस्कार करणाऱ्या मुलाचा आणि ऊर्वशीचा आंदोलनात नाचतानाचा व्हिडीओ शेअर करत छत्तीसगड भाजपनं त्यांची तुलना केली. तुम्ही कोणत्या जेन झीची निवड करणार, असा प्रश्न भाजपकडून विचारण्यात आला. भाजपच्या पोस्टला ऊर्वशीनं पीपीटीच्या माध्यमातून प्रत्युत्तर दिलं आहे.

माझ्या परवानगीशिवाय माझा व्हिडीओ वापरण्यात आला असून त्यावर कॅप्शन लिहिण्यात आलं आहे. तेव्हापासून मला अनेकांचे मेसेज येत आहेत. तू ठीक आहेस ना, अशी विचारणा होत आहे, असं ऊर्वशीनं व्हिडीओच्या सुरुवातीला म्हटलं आहे. 'मी तीच जेन झी विद्यार्थिनी आहे, जिच्या सोबत हे घडलं. मी या गोष्टीला गांभीर्यानं घेत नाही. त्यामुळे या व्हिडीओतून प्रतिक्रिया देत आहे,' असं ऊर्वशीनं हसत हसत म्हटलं.

भाजपनं शेअर केलेल्या व्हिडीओची ऊर्वशीनं पद्धतशीरपणे खिल्ली उडवली आहे. 'सर्वप्रथम, तुमचा कॅप्शन गेम खूपच कमजोर आहे. बाबरचा वारसा यासारख्या गोष्टींमुळे आजची तरुणाई जोडली जात नाही. त्यामुळे तरुणाईला जोडणारं कॅप्शन द्या,' असा सल्ला ऊर्वशीनं छत्तीसगड भाजपला दिला आहे.

२०२६ मध्येही फोडा आणि राज्य करा, असा प्रश्न करत ऊर्वशीनं भाजपचा समाचार घेतला. 'जेन झीच्या एकजुटीमुळेच संसदेपर्यंत नवे शब्द पोहोचले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ♦ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ♦ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135